MHJN060022372022

| | | |
|---|---|---|
| प्रकरण दाखल दिनांक | : | १८/१०/२०२२ |
| प्रकरण नोंदणी दिनांक | : | १८/१०/२०२२ |
| निकाल दिनांक | : | २५/०१/२०२३ |
| कालावधी | : | व. ०० म. ०३ दि. ०७ |

**भोकरदन येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, भोकरदन यांच्या न्यायालयात (पिठासीन अधिकारी श्री. सी. एस. देशपांडे)**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २२६/२०२२** **नि. क्र.०१**

१) **शकुंतलाबाई मच्छिंद्र सपकाळ,**
वय –४९ वर्षे, धंदा – घरकाम,

२) **गणेश मच्छिंद्र सपकाळ,**
वय –३२ वर्षे, धंदा – शेती,

३) **संजय मच्छिंद्र सपकाळ,**
वय –३० वर्षे, धंदा – शेती,
अर्जदार क्र. १ ते ३ रा. जळगांव सपकाळ,
ता. भोकरदन, जि. जालना.

४) **सविता सचिन निकम,**
वय –२७ वर्षे, धंदा – घरकाम,
रा. वाकडी,ता. भोकरदन, जि. जालना. ...... **अर्जदार**

***वि रु ध्द***

कोणीही नाही. ....... **वि. प.**

======================================

**अर्ज :–** महाराष्ट्र रेग्यूलेशन कायदा, १८२७ कलम ३ व ७ अन्वये
वारसा दाखला मिळण्याकरीता अर्ज.

======================================

==========================================

**विधीज्ञः–**अर्जदार करीता – श्री. आर. के. सपकाळ.
वि. प. – कोणीही नाही.

==========================================

## न्या य नि र्ण य

**(घोषित दिनांक २५/०१/२०२३)**

१) प्रस्तुतचा अर्ज महाराष्ट्र रेग्युलेशन कायदा कलम १८२७ चे कलम ३ व ७ अन्वये वारसा दाखला मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

***अर्जदार यांचे थोडक्यात कथन खालील प्रमाणेः–***

२) अर्जदार हे वर नमुद पत्यावरील कायमपणे रहिवाशी असुन अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी व अर्जदार क्र. २ ते ४ हे मयताचे मुले व मुलगी आहेत. मयत नामे–मच्छिंद्र दादाराव सपकाळ यांचे निधन दिनांक २२/०३/२०१९ रोजी मौजे– जळगांव सपकाळ येथे झालेला आहे. तसेच मयत मच्छिंद्र सपकाळ यांचे वडील नामे–दादा हनुमंता सपकाळ यांचे निधन दिनांक २७/०१/२०१४ रोजी व आई नामे–कडुबाई दादाराव सपकाळ यांचे निधन दिनांक ०८/०१/२०१७ रोजी झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत नामे–मच्छिंद्र दादाराव सपकाळ यांचे कायदेशीर व सरळ वारसदार आहेत. अर्जदार यांच्या व्यतिरीक्त अन्य कोणतेही वारसदार मयत नामे–मच्छिंद्र दादाराव सपकाळ यांना नाहीत.

३) अर्जदार यांचे पुढे कथन असे की, मयत नामे–मच्छिंद्र दादाराव सपकाळ यांचे पश्चात शासकीय व निमशासकीय कामा करीता गरज असल्याने त्यांनी सदरचा अर्ज अर्जदार यांनी न्यायालयात दाखल केला आहे.

४) अर्जदार यांची अर्जातील कथने व अर्जदार यांचा शपथेवरील पुरावा पाहिला असता, खालील वाद मुद्दे माझे विचारार्थ निघाले. अर्जदार यांच्या वकिलांनी केलेला युक्तीवादाचे अवलोकन करुन व समोर आलेल्या पुराव्याचे विश्लेषण करुन, मी खालील वाद मुद्यांचे खाली दिलेल्या कारणांसहित निष्कर्ष त्याखाली नोंदवले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे त्यांच्या मागणी प्रमाणे वारसा दाखला मिळण्यास पात्र आहेत काय ? | **होकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## :: <u>का र ण मि मां सा</u> ::

**<u>मुद्दा क्रमांक १ बाबतः</u>–**

५) अर्जदार क्र.३ नामे– संजय मच्छिंद्र सपकाळ यांनी प्रस्तुत अर्जाच्या समर्थनार्थ त्यांचे स्वतःचे शपथपत्र निशाणी क्र.१२ प्रस्तुत अर्जासोबत दाखल केले आहे. त्याच बरोबर निशाणी क्र.०४ सोबत मयतांचे मृत्यु प्रमाणपत्राच्या प्रती व अर्जदार यांचे आधारकार्डच्या प्रती दाखल केलेल्या आहेत. सदर आधार कार्डाच्या छायांकीत प्रतीवरुन अर्जदार व मयत नामे–मच्छिंद्र दादाराव सपकाळ हे या न्यायालयाचे स्थळसिमेत रहात असल्याचे स्पष्ट होते. तसेच निशाणी क्र.१४ येथे दिनांक ०५/११/२०२२ रोजीच्या दैनिक आनंद नगरी मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली जाहीर नोटीस दाखल केली. अर्जदार यांनी निशाणी क्र.१६ कडे पुरसीस दाखल करून त्यांचा पुरावा बंद केला.

६) सदर प्रकरणात दिनांक ०५/११/२०२२ रोजीच्या दैनिक आनंद नगरी

दैनिकामध्ये दिनांक ०२/११/२०२२ रोजीची जाहीर नोटीस प्रसिध्द करुन अर्जदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे वारसा दाखला देण्याबाबत हरकती मागविण्यात आल्या होत्या. परंतु सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाले नंतर मुदतीत अर्जदार यांच्या नांवे वारसा दाखला देण्यासंदर्भात कोणीही हरकत नोंदवली नाही. अर्जदार यांनी त्यांचे स्वतःचे सरतपासाचे शपथपत्र नि. क्र. १४ वर दाखल केले आहे व अर्जातील कथने जशीच्या तशी शपथेवर सांगितलेली आहेत.

७) अर्जदार यांचा शपथेवरील जबाब व अर्जाचे पुष्ठ्यर्थ दाखल केलेल्या कागदपत्रासंदर्भात या प्रकरणात कोणीही हजर होऊन आक्षेप नोंदविला नसल्यामुळे, जशीच्या तशी शाबीत झालेली आहेत. अर्जदार यांची अर्जातीत कथने व दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन मयत नामे– मच्छिंद्र दादाराव सपकाळ यांना अर्जदार हेच एकमेव सरळ व कायदेशीर वारस असल्याचे स्पष्ट होते. वरील सर्व बाबींचे अवलोकन करता अर्जदार यांना मागणी नुसार ते मयत नामे– मच्छिंद्र दादाराव सपकाळ यांचे सरळ व कायदेशीर वारस आहेत. म्हणुन महाराष्ट्र रेग्युलेशन कायदा, १८२७ मधील कलम ३ व ७ अंतर्गत, अर्जदार यांच्या नांवे वारसा दाखला (Heirship Certificate) देणे योग्य व न्यायोचीत होणार आहे. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी ***मुद्दा क्रमांक १ वरीलप्रमाणे होकारार्थी उत्तरीत केलेला आहे.***

**मुद्दा क्रमांक २ बाबतः–**

८) मुद्दा कमांक १ वरीलप्रमाणे होकारार्थी उत्तरीत केले असल्याने ***मी मुद्दा क्रमांक २ खालील अंतिम हुकूमाप्रमाणे उत्तरीत केला आहे.***

## // आ दे श //

१) अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जदार क्र. १) शकुंतलाबाई मच्छिंद्र सपकाळ २)गणेश मच्छिंद्र सपकाळ ३) संजय मच्छिंद्र सपकाळ ४) सविता सचिन निकम, हे मयत नामे–मच्छिंद्र दादाराव सपकाळ यांचे सरळ व कायदेशीर वारस आहेत, म्हणुन त्यांचे नांवे वारसा दाखला (Heirship Certificate) देण्यात येत आहे.

३) अर्जदार यांनी नियमानुसार न्यायालयीन शुल्क मुद्रांक दिल्यानंतर वारसा दाखला देण्यात यावा.

Digitally signed by CHAITANYA SUNILDATTA DESHPANDE
Date: 2023.01.25 15:39:29 +0530

**ठिकाण :भोकरदन.**
**दिनांक :२५/०१/२०२३.**

**(सी. एस. देशपांडे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**भोकरदन.**

## **प्र मा ण प त्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ संचकेतील प्रत्येक शब्द नि शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

कनिष्ठ लिपीकाचे नांव :- एस. डि. शिंदे

न्यायालयाचे नांव :- सह दिवाणी न्यायालय, भोकरदन

पी. डी. एफ. दिनांक :- २५/०१/२०२३.

स्वाक्षरित/-

कनिष्ठ लिपीक